## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- स्वत:वर विश्वास ठेवून प्रयत्नांची जोड दिली तर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल त्यामुळे विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून प्रयत्न करावेत असे आवाहन जळगाव जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा जनजागृती व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना श्री. नखाते बोलत होते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी केंद्राचे संचालक प्रा. अजय सुरवाडे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांची मंचाावर उपस्थिती होती.

श्री. नखाते यांनी ग्रामसेवक ते अतिरिक्त पोलीस अधीक्षकांपर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांना सांगतांना आलेल्या अडचणी त्यावर केलेली मात आणि स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचेच ही जिद्द उलगडून दाखविली. ध्येय, आत्मविश्वास, दृष्टीकोन आणि प्रयत्नांची जोड असल्याचे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणाले की, शिक्षणातूनच भविष्य घडणार असल्यामुळे शिक्षणाशिवाय पर्याय नाही. रोजगार हा आवश्यक असून गुगलवर डाउनलोड करून भाकरी मिळणार नाही. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन आयुष्यात करायचे असेल तर शिक्षण गरजेचे आहे. जिद्द, व्यक्तीमत्व, दृष्टीकोन आणि समज या गोष्टी शिक्षणामुळे मिळतात. माणूस संवेदनशील आणि जबाबदार होतो. आज नोकरीची स्पर्धा प्रचंड वाढली आहे. कंपन्यांमध्ये कौशल्य आवश्यक आहे. त्यापार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षांकडे विद्यार्थी वळला आहे. मात्र आपल्यातील क्षमता ओळखून या परीक्षा द्याव्यात आणि मेहनत घ्यावी असे आवाहन प्रा. माहेश्वरी यांनी केले. प्रारंभी प्रा. अजय सुरवाडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी आभार मानले. दिवसभर चालेल्या या कार्यशाळेत आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त कपील पवार, जळगावचे डॉ. जयदीप पाटील, प्रिती तारकस यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा जवळपास २०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## बातमी नं. २

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला आजपर्यंत सुवर्णपदक, विविध व्याख्यानमाला, शिष्यवृत्ती अथवा इतर उपक्रमांना ज्या संस्था अथवा व्यक्ती यांनी देणगी दिली आहे त्यांच्या या सकारात्मक कृतीबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उद्या रविवार दि.२३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठ सोबती स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेपासून गेल्या ३४ वर्षात अनेकांनी विद्यापीठाला विविध स्वरुपात मदतीचा हात दिला आहे. परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, व्याख्यानमाला, शैक्षणिक, संशोधन, क्रीडा व अन्य उपक्रमांसाठी देणगी/प्रायोजकत्व अथवा वस्तू स्वरुपात सहकार्य केले आहे. त्या पार्श्वभूमीवर या सर्व व्यक्ती अथवा संस्थाबददल कृतज्ञता व्यक्त करण्याची संकल्पना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांना सूचली असून या सर्व विद्यापीठ सोबतींसोबत रविवारी ते संवाद साधणार आहे. रविवारी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात हा स्नेह मेळावा होणार असून कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. विद्यापीठ सल्लागार समितीचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन, माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील व प्रा. पी.पी.पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती असणार आहे अशी माहिती कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी दिली.

## बातमी नं. ३

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि नंदुरबार जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जीटीपी महाविद्यालय, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी नंदुबार येथे झालेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात ३२ विद्यार्थ्यांची अंतिम तर ५२६ विद्यार्थ्यांची पुढील मुलाखतीसाठी निवड करण्यात आली.

नंदुरबार येथील जीटीपी महाविद्यालयात झालेल्या या रोजगार मेळाव्यात ३८ कंपन्या सहभागी झालया होत्या त्यामध्ये जळगाव, नाशिक, धुळे, आणि गुजरात येथील कंपन्यांचा समावेश होता. या मेळाव्यासाठी ११२३ तरूणांनी नोंदणी केली होती. या मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या रोजगार मेळाव्यातून ३२ विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली. तर ५२६ विद्यार्थ्यांची पुढील मुलाखतीसाठी निवड करण्यात आली.

या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन नंदुरबारच्या जिल्हाधिकारी मिताली सेठी यांच्या हस्ते करण्यात आले . अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी होते. यावेळी तालुका विधायक समिती नंदुरबार संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रघुवंशी, सहायक आयुक्त विजय रिसे, प्राचार्य तथा व्य.प. सदस्य प्रा. महेंद्र रघुवंशी, शंकर जाधव, प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्ज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा, आंतरवासिका समन्वयक संदीप कुमार उपस्थित होते.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
जनसंपर्क विभाग

**बातमी नं.४**

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात मराठी विभागातर्फे दि. २१ फेब्रुवारी रोजी "जागतीक बोली भाषा दिन" साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी टिवलीबाई पावरा व कांता लक्ष्मण बनकर यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होते. प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. यावेळी साहित्यसृजन या भित्तिपत्रिकेचे विमोचन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

भित्तिपत्रिकेमध्ये विविध बोली भाषेतील कविता सादर करण्यात आल्या. त्या मध्ये अनुक्रमे तडवी, अहिराणी बोलीतील विविध लोकगीते प्रसिध्द करण्यात आली आहेत. यावेळी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी विविध कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी विद्यार्थ्यांना संबोधतांना सांगितले की प्रत्येकाला आपल्या बोली भाषेचा अभिमान असायलाचं हवा. बोली भाषा ही अंतरंगातून येते म्हणूनच ती खूप नैसर्गिक असते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन खेमराज पाटील यांनी केले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि. २२ फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दि. २३ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या रासेयो राज्यस्तरीय उत्कर्ष महोत्सवासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ रवाना झाला.

९ विद्यार्थी व ९ विद्यार्थिनी आणि एक संघ व्यवस्थापक असा १९ जणांचा संघ शुक्रवारी रवाना झाला. या संघाला कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी,प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांच्या उपस्थितीत निरोप देण्यात आला. यावेळी रासेयो समन्वयक डॉ.दिनेश पाटील, डॉ.पांडुरंग पाटील तसेच शरद पाटील, शिवाजी पाटील, विलास पाटील, विजय बिऱ्हाडे उपस्थित होते. संघासोबत डॉ.संदीप माळी हे संघ व्यवस्थापक म्हणून गेले आहेत.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रासायनिक तंत्रज्ञान संस्थेच्या वतीने रासायनीक आणि संलग्न उद्योगातील स्टार्टअप संधीवर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा घेण्यात आली.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.निखील गांधी व डॉ. संदीप पाटील यांच्या उपस्थितीत झाले. संस्थेचे संचालक प्रा.ए.के.गोस्वामी अध्यक्षस्थानी होते. पुणे येथील ॲक्मे प्रोसेसचे संचालक नितिन मेटकर, वडोदराचे डॉ.निखील गांधी, कानपुरच्या ई-स्पिन नॅनोटेकचे संचालक डॉ.संदीप पाटील, जामनगरचे विशाल भार्गव, डॉ.धनंजय झोपे, मिथिला मेहता-मोरे, सागर अमलानी, हर्षल दाबे, या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ.तुषार देशपांडे डॉ.महेंद्र बारी, डॉ.भूषण चौधरी यांनी सहकार्य केले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थी विकास जिल्हा समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी तसेच प्राचार्य यांच्यासाठी शहादा तालुक्यातील बामखेडे येथील ग्रामविकास संस्था संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात दि. २५ फेब्रुवारी रोजी एक दिवसीय सहविचार कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे अशी माहिती विद्यार्थी विकास संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे व प्राचार्य डॉ.एच.एम.पाटील यांनी दिली.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ — दि. २२ फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी